

इतिहास

# वार्षिक अहवाल

2023-24

## श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री


DINESH KACHKURE
ASSISTANT PROFESSOR

VIJAY PANDE
HEAD & ASSO. PROF.

# हैदराबाद मुक्तीसंग्राम दिन

**उद्दिष्टे:**

1. हैद्राबाद मुक्तिसंग्राम दिन साजरा करणे
2. जयंतीनिमित्त आयोजित व्याख्यानातून विद्यार्थ्यांना मुक्तीसंग्राम दिनाविषयी ज्ञान संक्रमीत करणे.
3. मुक्तीसंग्राम लढ्याचे महत्व समजून घेऊन लढ्यात अमर हुतात्म्यांना अभिवादन करणे

महाविद्यालयाच्या इतिहास विभागातर्फे दिनांक 18 सप्टेंबर 2024 रोजी महाविद्यालयात मराठवाडा स्वातंत्र्य संग्राम या विषयावर प्रश्नमंजुषा घेण्यात आली. या प्रश्नमंजुषामध्ये एकूण 30 प्रश्न विचारण्यात आले. या परीक्षेत एकूण 50 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. ज्यामध्ये गुणानुक्रमे आलेले विद्यार्थी खालील प्रमाणे.

**प्रथम**- मंजुषा संतोष पेरकर

**द्वितीय**- पूजा विष्णू ढोके

**तृतीय**- आरती गयनाजी केजभट

कार्यक्रमाचे प्रा. डॉ. दिनेश कचकुरे व प्रा. विजय पांडे यांनी आयोजन केले.

# भित्तीपत्रक प्रकाशन

1

इतिहास विभागाच्या वतीने आरती वाघ, मंजुषा पेहरकर, सोमीनाथ ठाले, प्राजक्ता इंगळे, आर्सिया पठाण यांनी संपादित केलेल्या **"भारतीय राष्ट्रीय सभेची महत्त्वपूर्ण अधिवेशने"** या भितीपत्रकाचे प्रकाशन करण्यात आले. त्यात भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या काळातील अधिवेशन, वर्ष, अधिवेशन स्थळ, अधिवेशन अध्यक्ष, वैशिष्ट्ये या विषयी माहिती देण्यात आली.

या भितीपत्रकाचे प्रकाशन दि. 23 ऑक्टोबर 2023 रोजी प्रकाशित करण्यात आले.


2

इतिहास विभागाच्या वतीने दुसरे भितीपत्रक मंजुषा पेहरकर, प्राजक्ता इंगळे यांनी संपादित केलेल्या **शिवराज्याभिषेक** (स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ३५०) या भितीपत्रकाचे प्रकाशन करण्यात आले. शिवराज्याभिषेकाची तयारी, राज्याभिषेक समारंभ, शिवराज्याभिषेकाचे महत्व, अभिप्राय, हेन्री ऑक्झिंडनने सांगितलेली हकिकत या विषयी माहिती देण्यात आली.

या भितीपत्रकाचे प्रकाशन दि. 13 मार्च 2024 रोजी प्रकाशित करण्यात आले.

# अतिथी व्याख्यान 1

महाविद्यालयाच्या इतिहास विभागाच्या वतीने प्रा. डॉ. विनोद बोरसे, इतिहास विभाग, आसारामजी भांडवलदार महाविद्यालय, देवगाव रं. जि. छत्रपती संभाजीनगर यांचे दिनांक 5 ऑगस्ट 2023 रोजी 11:40 वाजता बी. ए. तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी अतिथी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या तासिकेमध्ये महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना "इतिहासलेखनशास्त्र" या अभ्यासक्रमातील "इतिहासाचे सहाय्यकारी शास्त्रे" या घटकावर मार्गदर्शन केले.




अतिथी व्याख्यान (Guest Lecture): प्रा. डॉ. विनोद बोरसे, उपस्थित विद्यार्थी

# अतिथी व्याख्यान 2

महाविद्यालयाच्या इतिहास विभागाच्या वतीने प्रा. डॉ. अमोल म्हस्के, इतिहास विभाग, प्रतिष्ठान महाविद्यालय, पैठण जि. छत्रपती संभाजीनगर यांचे दिनांक 12 फेब्रुवारी 2024 रोजी 11:40 वाजता बी. ए. तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी अतिथी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या तासिकेमध्ये महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना इतिहासलेखनशास्त्र अभ्यासक्रमातील “वस्तुसंग्रहालय” या घटकावर मार्गदर्शन केले.




अतिथी व्याख्यान (Guest Lecture): प्रा. डॉ. अमोल म्हस्के, उपस्थित विद्यार्थी

# शिवजयंती : निबंध स्पर्धा

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्ताने फेब्रुवारी महिन्यात महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले होते. निबंध स्पर्धेचा विषय होता "शिवचरित्रातून काय शिकावे?". या निबंध स्पर्धेत महाविद्यालयातील एकूण 25 विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

त्यात गुणानुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय आलेले विद्यार्थी खालीलप्रमाणे होय.

रूपाली भाऊसाहेब उबाळे, बीए प्रथम वर्ष- प्रथम,

महिमा हरिकिसन काळे, बीए प्रथम वर्ष- द्वितीय,

कृष्णा विजय राठोड, बीए द्वितीय वर्ष- तृतीय,

वैष्णवी लक्ष्मण वाघ, बीए प्रथम वर्ष- उत्तेजनार्थ,

मनीषा एकनाथ कुदळे, बीए द्वितीय वर्ष- उत्तेजनार्थ

# शैक्षणिक सहल

महाविद्यालयाची व इतिहास विभागाचे शैक्षणिक अभ्यास सहल दिनांक 14 फेब्रुवारी 2024 रोजी देवगिरी किल्ला व वेरूळ लेणी येथे आयोजित करण्यात आली. या शैक्षणिक सहलीमध्ये एकूण 24 विद्यार्थी व प्रा. विजय पांडे, डॉ. नितीन माळेगावकर, डॉ. राजश्री पवार हे प्राध्यापक सहभागी झाले होते. विजय पांडे यांनी किल्ले देवगिरी किल्ल्याविषयी व वेरूळ लेणी विषयी विद्यार्थ्यांना माहिती सांगितली.




देवगिरी किल्ला, उपस्थित प्राध्यापक व विद्यार्थी




वेरूळ लेणी उपस्थित प्राध्यापक व विद्यार्थी

# NAAC चे सादरीकरण

NAAC च्या त्रिसदस्यीय समितीने महाविद्यालयास 28, 29 ऑक्टोबर 2023 रोजी भेट देऊन महाविद्यालयाची पाहणी केली व विविध विभागांना भेटी दिल्या. 28 ऑक्टोबर 2023 रोजी समितीसमोर इतिहास विषयाचे सादरीकरण केले गेले. विजय पांडे यांनी इतिहास विभागाचे मागील पाच वर्षाच्या अहवालाचे सादरीकरण केले व विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे दिली.

तसेच इतिहास वस्तुसंग्रहालयास भेट देऊन पाहणी केली. त्याप्रसंगी विजय पांडे व डॉ. दिनेश कचकुरे यांनी त्यांना माहिती दिली.

# पोस्टर प्रदर्शनी

## जनजाती वीरांचे स्वातंत्र्यसंग्रामातील योगदान

दिनांक 17 ऑक्टोबर 2023 रोजी श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालयांमध्ये इतिहास विभाग व  देवगिरी कल्याण आश्रम छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने जनजातीवीरांचे स्वातंत्र्यसंग्रामातील योगदान या विषयावर 50 जनजाती/ आदिवासी वीरांच्या माहितीपटाचे पोस्टर्स रूपाने प्रदर्शन भरविण्यात आले. या पोस्टर्स प्रदर्शनातून अज्ञात आणि दुर्लक्षित अशा भारतीय जनजातीविरांच्या स्वातंत्र्यसंग्रामातील योगदानावर प्रकाश टाकण्यात आला. सदर प्रदर्शनाला महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी भेट दिली.

या प्रसंगी देवगिरी कल्याण आश्रमचे श्री राजेश पडोळे, श्री चंद्रकांत मुगले आणि श्री अर्जुन लवांडे यांनी उपस्थित होते. भेट देणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना जनजातीवीरांच्या योगदानाची माहिती सांगितली.




श्री राजेश पडोळे विद्यार्थ्यांना जनजातीवीरांच्या योगदानाची माहिती सांगताना.

# जनजाती वीरांचे स्वातंत्र्यसंग्रामातील योगदान व्याख्यान

17 October 2023

**Report of activity for submission to IQAC**

**दिनांक** : 17 Oct. 2023

**कार्यक्रम पद्धती** : व्याख्यान

**वेळ** सकाळी : 11 वाजता

**सुत्रसंचलन** : प्रा. विजय पांडे

**वक्ते** : श्री राजेश शंकरराव पडोळे सह संघटनमंत्री, देवगिरी प्रांत

**अध्यक्ष** : प्राचार्य डॉ. एस.आर. टकले

**सहभागी** :

1. श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, इतिहास विभाग
2. देवगिरी कल्याण आश्रम, छत्रपती संभाजीनगर

**एकूण सहभागी** : 50

**विषय** : जनजातीवीरांचे स्वातंत्र्यसंग्रामातील योगदान

**उद्दिष्टे** :

1. विद्यार्थ्यांना जनजातीवीरांची माहिती सांगणे.

2. इतिहासाने दखल न घेतलेल्या जनजातीवीरांच्या कार्याचे स्मरण करणे

**कार्यक्रमाचा घोषवारा :**

श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय इतिहास विभाग आणि देवगिरी कल्याण आश्रम यांच्या संयुक्त विद्यमाने जनजातीवीरांचे स्वातंत्र्यसंग्रामातील योगदान या विषयावर दिनांक 17 ऑक्टोबर 2023 सकाळी 11 वाजता व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. सदर कार्यक्रमास श्री राजेश शंकरराव पडोळे, सह संघटनमंत्री, देवगिरी प्रांत हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. त्यासोबतच

श्री चंद्रकांत मुगले आणि श्री अर्जुन लबांडे हे प्रमुख पाहुणे म्हणून हजर होते. सदर कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. आर. टकले सर हे अध्यक्ष म्हणून लाभले.

या कार्यक्रम प्रसंगी बोलताना श्री पडोळे यांनी सर्वप्रथम भारतातील विविध जनजातीवीरांच्या कार्याचा आढावा घेतला. 1857 च्या उठावापासून ते भारतीय स्वातंत्र्यसंग्रामापर्यंतच्या विविध अज्ञात जनजातीवीरांचे योगदानावर त्यांनी प्रकाश टाकला. आतापर्यंत भारतीय इतिहासाने कोणतीही दखल न घेतलेल्या आणि दुर्लक्षित राहिलेल्या या सर्व जनजाती वीरांच्या कार्याचे स्मरण होणे हे आजच्या काळाची गरज आहे असेही मत त्यांनी मांडले.

या कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक विद्यार्थी उपस्थित होते. एकूण 50 विद्यार्थ्यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. विजय पांडे यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ दिनेश कचकुरे यांनी मांडले.




वक्ते : श्री राजेश शंकराव पडोळे



उपस्थित विद्यार्थी

# वस्तुसंग्रहालय उभारणी

महाविद्यालयात 2022-23 या वर्षात इतिहास विभागातर्फे इतिहास वस्तुसंग्रहालयाची उभारणी करण्यात आली. संभाजीनगर जिल्ह्यातील वारसा स्थळे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या 350 व्या राज्यभिषेक दिनानिमित्त विविध किल्ले व मावळ्यांची माहिती तसेच भारतातील इतिहास समजून घेण्यासाठी लिखित व लिखित साधने यासंदर्भातील पोस्टर तयार करून ते वस्तुसंग्रहालयात लावण्यात आले.

तसेच नाणी संग्रहासाठी तीन रॅकमध्ये नाणी लावण्यात आली. इतिहास विभागाने जवळपास 300 नाण्यांचा संग्रह केलेला आहे. ज्यामध्ये आठशे वर्षांपूर्वीचेही नाणी आहेत. तसेच विविध देशातील नाण्यांचा ही संग्रह आहे.

---

**270 जणांची भेट :**

इतिहास विभागाच्या या वस्तू संग्रहालयास जवळपास 270 जणांनी 2023 24 या शैक्षणिक वर्षात भेट दिली आहे.

---

**नाणी भेट :**

महाविद्यालयाच्या इतिहास विभागाच्या वस्तुसंग्रहालयास प्रा. डॉ. अफसर सर, चीस्तीया महाविद्यालय, खुलताबाद यांनी कतार या देशाच्या नोटा तर श्री तुपे सर, पाथ्री महाविद्यालय यांनी 40 नाणी भेट दिली. त्याबद्दल त्यांना आभार पत्र दिले गेले.


ताजमहल




लाल किल्ला
कुतुबमिनार
CLASS ROOM
मध्ययुगीन नाणी
चंद्रगुप्त मौर्य नाणे
सम्राट अशोक नाणे


REDMI K20 PRO
VIJAY PANDE



साहस शिकवा, संयम शिकवा
ह्या जीवन चेतना ||१||
नको कधी तो गर्व यशाचा,
नको कधी आळस कामाचा,
द्वेष कुणाचा नको कधीही,
फुलवा सद्भावना ||२||
रक्षण करणे या सृष्टीचे,
वाटे आम्हा अति मोलाचे,
समतेची आणिक समतेची,
आम्हा प्रेरणा ||३||
VIJAY PANDE